# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/०२/२०२५ (सोमवार)**

---

## महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांच्या उपक्रमा अंतर्गत पोलीस स्टेशन बेला येथे तीन नविन कायदयांबाबत जनजागृती कार्यशाळा

**पोलीस स्टेशन बेला** :— मा.श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामिण जिल्हा यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन बेला अंतर्गत खालील ठिकाणी नविन कायदे **०१) भारतीय न्याय संहीता—२०२३ , ०२) भारतीय नागरीक सुरक्षा संहीता—२०२३, ०३) भारतीय साक्ष अधिनियम २०२३** बाबत जनजागृती संबधनाने २ ठिकाणी कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत.

१) दिनांक ०८/०२/२०२५ रोजी पोलीस स्टेशन बेला अंतर्गत मौजा बेला येथे तीन वरील नविन कायदयाचे जनजागृती संबधनाने कार्य शाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेत श्रीमती अश्लेषा शाउजी विधी तज्ञ, डॉ. समीर व्दीवेदी यांनी नवीन कायदयाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.सदर कार्यशाळेत बेला पोलीस स्टेशन हदितील सरपंच ,गावातील प्रतिष्ठीत नागरीक , पोलीस पाटील , तंटामुक्ती समिती सदस्य ,अंगणवाडी सेवीका व मदतनिस ,महीला बचत गटातील सदस्या ,ग्रामिणा रूग्णालय सेविका ,आशा वर्कर ,कॉलेज/शाळेतील प्राध्यापक वर्ग ,महीला दक्षता समितीतील सदस्या पत्रकार व बेला पोलीस स्टेशनचे अधिकारी/अंमलदार उपस्थित होते . सदर कार्यशाळेत उपस्थिती असलेल्या नागरीकांना नविन कायदा संबधाने जनजागृती करून मार्गदर्शन करण्यात आले.

२) दि. १०/०२/२०२५ रोजी पोलीस स्टेशन बेला अंतर्गत मौजा सिर्सी येथे तीन नविन कायदे बाबत जनजागृती संबधनाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेत श्रीमती अश्लेषा शाउजी विधीतज्ञ ,डॉ. समीर व्दीवेदी यांनी भारत सरकारच्या तीन नवीन कायदया बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.सदर कार्य शाळेत बेला पोलीस स्टेशन हद्दीतील सरपंच ,गावातील प्रतिष्ठीत नागरीक , पोलीस पाटील , तंटामुक्ती समिती सदस्य ,अंगणवाडी सेवीका व मदतनिस ,महीला बचत गटातील सदस्या ,ग्रामिणा रूग्णालय सेविका ,आशावर्कर ,कॉलेज/शाळेतील प्राध्यापक वर्ग ,महीला दक्षता समिती सदस्या ,पत्रकार व बेला पोलीस स्टेशनचे अधिकारी/अंमलदार उपस्थित होते.




नागपूर ग्रामीण पोलीस दला
तर्फे
पोलीस स्टेशन बेला
अंतर्गत नवीन कायद्याचे
मार्गदर्शन शिबिर

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर